# प्रेस नोट

दि.०५/०६/२५

**विनोबा भावे नगर कुर्ला पोलिसांनी मोटार वाहन चोरी करणारा सराईत आरोपी यांस अटक करुन एकूण ०३ गुन्हे उघडकीस आणल्याबाबत**

दि.२८/०५/२०२५ रोजी रात्री २१:०० वा. ते २२:०० वा. च्या दरम्यान फिर्यादी नामे श्री. दिपक कुमार छेदीलाल साहू वय २२ वर्षे, धंदा रिक्षाचालक रा.ठी. रुम नं. १४/बी, फैजुल्ला मुकादम चाळ पटेलवाडी, कुर्ला मुंबई ७० यांनी त्यांच्या मालकीची ऑटोरिक्षा ही बिल्डींग नं. १०, एच डी आय एल परिसर, कुर्ला प. मुंबई याठिकाणी पार्क केली होती. सदर ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात इसमाने सदर ची ऑटोरिक्षा चोरी केल्याची खात्री झाल्यावरुन विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुद्ध गु.र.क्र. ३१९/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०५, माहीम मुंबई, मा. सहायक पोलीस आयुक्त, कुर्ला विभाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु करण्यात आला. गुन्हे प्रकटीकरण पथकाने अथक परिश्रम करुन गुन्हयातील ०१ सराईत आरोपी नामे **मोहम्मद सगीर अब्दुल मजीद सिद्दिकी उर्फ मॅगी वय २७ वर्षे** यांस तांत्रिक कौशल्याचा व गोपनीय माहितीदारांच्या मदतीने ताब्यात घेण्यात आले त्यावेळी त्याच्याकडून गुन्हयातील चोरी गेलेली ऑटोरिक्षा हस्तगत करण्यात आली. तसेच त्याच्याकडे अधिक तपास करुन पोलीस ठाणे दाखल इतर दोन गुन्हयातील दोन मोटारसायकल हस्तगत करण्यात आले आहेत. तरी सदर आरोपीकडून **एकूण ०३ गुन्हे उघडकीस आणून एकूण १,७०,०००/- रु. किंमतीचे मोटारवाहन हस्तगत करण्यात यश** प्राप्त झाले आहे. तरी पुढील तपास चालू आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती सो, सह पोलीस आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. विक्रम देशमाने सो, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त श्री. गणेश गावडे सो, मा. सहायक पोलीस आयुक्त कुर्ला विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र श्रीरसागर, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. शिवानंद देवकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि अमर चेडे, पो.ह. गांगुर्डे, गवारे पो.शि. सांगळे, महाजन, विशे, उगले यांनी केली आहे.

----------------------------------------::::::----------------------------------------